BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

ग्रामीण महिलांच्या उच्च शिक्षणातील गरिबी सामाजिक विषमता आणि समावेशक विकास: एक समाजशास्त्रीय अध्ययन

वर्षा किसनराव चव्हाण

सहाय्यक प्राध्यापक (CHB)

समाजशास्त्र विभाग

Vatsalabai Naik Mahavidyalaya, Pusad

ई-मेल :- vnaik3034@gmail.com

सारांश (Abstract) :-

भारतीय समाजाच्या सामाजिक आणि आर्थिक विकासामध्ये शिक्षणाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. विशेषतः महिलांचे उच्च शिक्षण हे त्यांच्या वैयक्तिक विकासाबरोबरच कुटुंब, समाज आणि राष्ट्राच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण साधन आहे. ग्रामीण भागातील महिलांना उच्च शिक्षण घेताना गरिबी,आर्थिक अडचणी, सामाजिक विषमता, कुटुंबीयांच्या जबाबदाऱ्या,सुरक्षिततेची समस्या, प्रवासाच्या अडचणी, डिजिटल साधनांचा अभाव आणि शैक्षणिक सुविधांची मर्यादित उपलब्धता अशा अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे उच्च शिक्षणातील संधी सर्व महिलांना समान प्रमाणात उपलब्ध होत नाही. त्यामुळे महिला उच्च शिक्षण घेण्यासाठी असमर्थ ठरतात. गरीब आहे केवळ उत्पन्नाची कमतरता नसून शिक्षण, आरोग्य, रोजगार, सामाजिक सहभाग आणि निर्णय क्षमता यांसारख्या अनेक संधींवरील मर्यादा निर्माण करणारी सामाजिक परिस्थिती आहे. ग्रामीण महिलांच्या उच्च शिक्षणातील विषमता कमी करण्यासाठी आर्थिक मदत, शिष्यवृत्ती, सुरक्षित वाहतूक, वसतिगृह सुविधा, डिजिटल शिक्षण, कौशल्य विकास आणि कुटुंबीयांची सकारात्मक भूमिका आवश्यक आहे. समावेशक विकासाच्या दृष्टीने महिलांना गुणवत्ता पूर्ण उच्च शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

Key Words : ग्रामीण महिला, उच्च शिक्षण,गरिबी, सामाजिक विषमता,आर्थिक विषमता, सर्वसमावेशक विकास,महिला सक्षमीकरण, सामाजिक परिवर्तन

1. प्रस्तावना :-

भारत हा विविध सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांनी समृद्ध असलेला देश आहे. भारतीय समाजांच्या विकासामध्ये शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये ज्ञान कौशल्य आत्मविश्वास आणि सामाजिक जाणीव निर्माण होते. महिलांच्या बाबतीत शिक्षणाचे महत्त्व अधिक व्यापक आहे. शिक्षित महिला स्वतःच्या जीवनाविषयी निर्णय घेण्यास सक्षम होण्याबरोबरच कुटुंबाच्या आरोग्य, शिक्षण आणि आर्थिक परिस्थितीवरही सकारात्मक परिणाम घडवू शकते. मात्र ग्रामीण भागातील महिलांना उच्च शिक्षणाच्या संधी मिळताना अनेक सामाजिक व आर्थिक अडथळ्यांना सामोरे जावे लागते. गरीब कुटुंबातील मुलींसाठी महाविद्यालयीन शिक्षणाचा खर्च, प्रवासाचा खर्च, पुस्तके,

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

डिजिटल साधने आणि इतर शैक्षणिक खर्च हे मोठे अडथळे ठरू शकतात. त्याचबरोबर काही कुटुंबांमध्ये मुलींच्या शिक्षणापेक्षा विवाह घरगुती कामे आणि कुटुंबीयांच्या जबाबदाऱ्यांना अधिक महत्त्व दिले जाते.

भारताच्या उच्च शिक्षण क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढला आहे. Ministry of education च्या AISHE 2020-21 नुसार उच्च शिक्षणातील एकूण विद्यार्थी नोंदणी मध्ये महिलांचा वाटा **48.67%** होता. त्याच अहवालानुसार उच्च शिक्षणातील 57.6% संस्था ग्रामीण भागात स्थित होत्या. अलीकडील सरकारी आकडेवारीतही महिलांच्या उच्च शिक्षणातील सहभागांमध्ये वाढ दिसून येते. Ministry of statistics and programme implementation च्या मधील woman and man in India 2025 मधील माहितीनुसार 2022-23 मध्ये महिलांचा उच्च शिक्षणातील Gross enrolment Ratio (GER) **30.2** पर्यंत पोहोचला. तरीही नोंदणी वाढणे म्हणजे सर्व सामाजिक गटातील महिलांना समान संधी मिळणे असे नाही. ग्रामीण, गरीब आणि सामाजिकदृष्ट्या वंचित कुटुंबांतील महिलांच्या अनुभवांचा स्वतंत्रपणे विचार करणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील महिलांना उच्च शिक्षणासाठी अनेक अडथळ्यांना सामोरं जावे लागते. ग्रामीण कुटुंबाची आर्थिक परिस्थिती,महाविद्यालयाचे अंतर,वाहतूक सुविधा,सामाजिक रूढी,पालकांची मानसिकता आणि मुलींच्या सुरक्षिततेबाबतच्या चिंता या घटकांना त्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो. काही महिलांना पदवीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर पदव्युत्तर शिक्षण घेण्याची इच्छा असूनही आर्थिक परिस्थितीमुळे ते शक्य होत नाही. पदवी शिक्षणामुळे आपला दर्जा उंचावा असे तिची इच्छा असते परंतु ती इच्छा गरिबीमुळे पूर्ण होत नाही. म्हणूनच ग्रामीण महिलांच्या उच्च शिक्षणाचा प्रश्न केवळ शैक्षणिक प्रश्न म्हणून न पाहता तो गरीबी, सामाजिक विषमता,लिंगाधारीत भेदभाव आणि विकासातील असमानता या व्यापक सामाजिक संदर्भात समजून घेणे आवश्यक आहे.

2. संशोधन समस्येचे स्वरूप (statement of the problem) :-

भारतीय संविधानाने स्त्री-पुरुष समानतेचे तत्व स्वीकारलेले आहे. प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार आणि शिक्षणाच्या संधीचा लाभ मिळणे अपेक्षित आहे. तरीही प्रत्यक्ष सामाजिक परिस्थितीमध्ये आर्थिक व सामाजिक विषमता दिसून येते. ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांमध्ये उच्च शिक्षणासाठी लागणारा खर्च परवडत नाही. शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क पुस्तके प्रवास वस्तुतिगृह इंटरनेट आणि डिजिटल उपकरणे यांचा खर्च आणि कुटुंबासाठी मोठा असतो. अशा परिस्थितीत मुलींच्या शिक्षणाला व उच्च शिक्षणाला प्राधान्य मिळेलच असे नाही. काही कुटुंबांमध्ये मुलांच्या शिक्षणाला गुंतवणूक आणि मुलींच्या शिक्षणाला अतिरिक्त खर्च म्हणून पाहिले जाते. मुलींच्या शिक्षणानंतर विवाह होणार असल्यामुळे त्यांच्यावर अधिक खर्च करण्याची आवश्यकता नाही. ही मानसिकता मानसिकता काही ठिकाणी आढळते ही मानसिकता पितृसत्ताक सामाजिक व्यवस्थेची संबंधित आहे. याशिवाय ग्रामीण भागातील अनेक मुलींना उच्च शिक्षणासाठी गावाबाहेर जावे लागते. प्रवासाची गैरसोय सुरक्षिततेची चिंता आणि कुटुंबीयांचा विरोध यामुळे त्यांचे शिक्षण मर्यादित राहू शकते. त्यामुळे प्रस्तुत संशोधनांमध्ये प्रमुख समस्या अशी आहे,की ग्रामीण महिलांच्या उच्च शिक्षणातील गरिबी आणि सामाजिक विषमता कोणत्या स्वरूपात दिसून येते आणि या अडचणी दूर करून समावेशक विकासाची प्रक्रिया कशी मजबूत करता येईल?

3. संशोधनाची उद्दिष्टे (objective of study) :-

या संशोधन पेपरची प्रमुख उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत :

1. ग्रामीण महिलांच्या उच्च शिक्षणातील आर्थिक अडचणींचा अभ्यास करणे.
2. गरिबी आणि सामाजिक विषमतेचा महिलांच्या उच्च शिक्षणावर होणारा परिणाम स्पष्ट करणे.
3. ग्रामीण महिलांच्या शिक्षणातील सामाजिक व सांस्कृतिक अडथळ्यांचा अभ्यास करणे.
4. उच्च शिक्षणाच्या माध्यमातून महिलांच्या सामाजिक व आर्थिक सक्षमीकरण यांच्यातील संबंध स्पष्ट करणे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

5. समावेशक विकासासाठी आवश्यक शैक्षणिक व सामाजिक उपाययोजना सुचविणे.
6. ग्रामीण महिलांच्या उच्च शिक्षणासाठी आवश्यक शैक्षणिक व सामाजिक उपाययोजना सुचविणे.
7. ग्रामीण महिलांच्या शैक्षणिक विकासामध्ये सरकारी धोरणे व योजनांची भूमिका समजावून घेणे.

4. संशोधन प्रश्न (Research question) :-

1. ग्रामीण भागातील गरिबांचा महिलांच्या उच्च शिक्षणावर कोणत्या प्रकारे परिणाम होतो?
2. जात, वर्ग आणि लिंगधारित विषमता महिलांच्या शैक्षणिक संधींवर कशा प्रकाश टाकते?
3. कुटुंबाची आर्थिक व सामाजिक प्रश्न उच्च शिक्षणाच्या निवडीवर परिणाम करते का?
4. महिलांचे उच्च शिक्षण समावेशक विकासाला कशाप्रकारे चालना देऊ शकतो?
5. डिजिटल सुविधांचा अभाव ग्रामीण महिलांच्या उच्च शिक्षणामध्ये अडथळा ठरतो का?

5. संशोधनाची गृहितके (Research Hypothesis) :-

प्रस्तुत संशोधनासाठी पुढील गृहीतके मांडण्यात आली आहे.

1. ग्रामीण भागातील आर्थिक गरिबींचा महिलांच्या उच्च शिक्षणाच्या संधीवर नकारात्मक परिणाम होतो.
2. कुटुंबातील शैक्षणिक वातावरण आणि पालकांचा दृष्टिकोन मुलींच्या उच्च शिक्षणातील सहभागांवर प्रभाव टाकतो
3. सामाजिक आणि लैंगिक विषमता महिलांच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये अडथळे निर्माण करते.
4. उच्च शिक्षणामुळे महिलांच्या सामाजिक आणि आर्थिक सक्षमीकरणाच्या संधी वाढतात.

6. संशोधन पद्धती (Research Methodology) :-

सदर संशोधन पेपर हा वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक स्वरूपाचा आहे. या अभ्यासासाठी दुय्यम माहितीचा वापर करण्यात आला आहे. सरकारी अहवाल, ministry of education चे AISHE अहवाल, ministry of statistics and program implementation चे women and men in India,शैक्षणिक अहवाल, पुस्तके आणि संशोधनात्मक साहित्य यांचा संदर्भ घेण्यात आला आहे. All India survey on higher education (AISTHE) हे भारतातील उच्च शिक्षणाची स्थिती समजून घेण्यासाठी महत्त्वाचे अधिकृत स्त्रोत आहे. त्यामध्ये विद्यार्थी नोंदणी, शिक्षक, पायाभूत सुविधा,Gender parity index Gross enrollment Ratio यासारख्या निर्देशांकांची माहिती संकलित केली जाते. National education policy 2020, महिला व पुरुष विषयक सरकारी अहवाल, शैक्षणिक पुस्तके, समाजशास्त्रीय साहित्य, संशोधन लेख आणि उपलब्ध शैक्षणिक दस्तऐवज यांचा आधार घेण्यात आलेला आहे. या संशोधनामध्ये ग्रामीण महिलांच्या उच्च शिक्षणातील अडचणींची सामाजिक आर्थिक, सांस्कृतिक,स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे, आणि त्यामध्ये संकलित माहिती व दुय्यम माहितीचे गुणात्मक पद्धतीने विश्लेषण करण्यात आलेले आहे. अभ्यासात कोणतीही प्रत्यक्ष सर्वेक्षण मुलाखती, किंवा प्रश्नावली द्वारे माहिती संकलित करण्यात आलेली नाही. त्यामुळे निष्कर्ष उपलब्ध साहित्य आणि सरकारी आकडेवारीच्या विश्लेषणावर आधारित आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

7. संबंधित साहित्याचा आढावा (Review of Literature) :-

महिला शिक्षण आणि सामाजिक परिवर्तन या विषयांच्या विविध समस्या शास्त्रज्ञांनी वेगवेगळ्या दृष्टिकोनातून अभ्यास केला आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक समानता, शिक्षण आणि मानवी प्रतिष्ठेला विशेष महत्त्व दिले. त्यांच्या विचारानुसार शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे आणि वंचित घटकांच्या प्रगतीचे प्रभावी साधन आहे स्त्रियांच्या अधिकारांचा आणि समान संधीचा प्रश्न हा व्यापक सामाजिक न्यायाच्या प्रक्रियेशी जोडला आहे. "पियरे बोरद्यु यांच्या सांस्कृतिक भांडवलाच्या संकल्पनेनुसार व्यक्तींच्या कुटुंबातील सामाजिक व सांस्कृतिक वातावरणाचा शैक्षणिक संधींवर प्रभाव पडतो." आर्थिकदृष्ट्या आणि सांस्कृतिकदृष्ट्या सक्षम कुटुंबातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक यशासाठी आवश्यक संसाधने सहज उपलब्ध होऊ शकतात. या उलट वंचित कुटुंबातील विद्यार्थ्यांना अनेक मर्यादांना सामोरे जावे लागते.

अमर्त्य सेन यांच्या क्षमता दृष्टिकोना नुसार विकास म्हणजे केवळ उत्पन्न वाढ नसून व्यक्तीला स्वतःच्या जीवनातील संधी निवडण्याचे स्वातंत्र उपलब्ध होणे होय. दृष्टिकोनातून महिलांचे उच्च शिक्षण म्हणजे केवळ पदवी प्राप्त करणे नसून रोजगार, सामाजिक सहभागात निर्णय क्षमता विकसित करण्याची संधी आहे. समाजशास्त्रीय आणि विकास विषयक दृष्टिकोनाचा विचार करता ग्रामीण महिलांच्या उच्च शिक्षणाचा प्रश्न हा आर्थिक संसाधने सांस्कृतिक भांडवल सामाजिक स्थान आणि उपलब्ध संधी यांच्या परस्परातून समजून घेणे आवश्यक आहे.

8. ग्रामीण महिलांच्या उच्च शिक्षणातील गरीबीची समस्या :-

ग्रामीण महिलांच्या उच्च शिक्षणासमोरील सर्वात महत्त्वाच्या समस्या पैकी गरिबी आणि आर्थिक अडचण ही एक मोठी समस्या असल्यामुळे व ग्रामीण कुटुंबांमध्ये उत्पन्न मर्यादित असल्यामुळे कुटुंबातील उपलब्ध नैसर्गिक साधनांचा वापर अनेकदा मुलांच्या शिक्षणासाठी केला जातो. मुलींच्या शिक्षणाला दुय्यम महत्त्व मिळण्याची शक्यता असते. उच्च शिक्षणासाठी प्रवेश शुल्क, परीक्षा शुल्क,पुस्तके, प्रवास,वसतिगृह,इंटरनेट, आणि डिजिटल उपकरणे यासाठी खर्च होतो. गरीब कुटुंबातील मुलींसाठी हा खर्च शिक्षण सुरू ठेवण्यांमध्ये अडथळा ठरू शकतो. यामुळे काही मुली पदवीपर्यंत शिक्षण घेऊन पुढील शिक्षण थांबवतात. काही मुलींना शिक्षणासोबतच घरगुती कामे किंवा उत्पन्न मिळवण्याची जबाबदारी पार पाडावी लागते. अशा परिस्थितीत त्यांना अभ्यासासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. उदाहरणार्थ ग्रामीण भागातील एखाद्या विद्यार्थ्यांना पदवी शिक्षणासाठी दररोज गावापासून दूर असलेल्या महाविद्यालयात जावे लागत असेल, गावापासून दूर जाताना सुरक्षिततेचा प्रश्न उद्भवतो व तिच्या कुटुंबाला प्रवासासाठी नियमित खर्च करावा लागतो. कुटुंबातील उत्पन्न मर्यादित असल्यास हा खर्च शिक्षण सुरू ठेवण्याच्या निर्णयावर परिणाम करू शकतो. याशिवाय शेतीच्या हंगामात महिलांना घरगुती आणि शेती विषयक कामांमध्ये सहभागी व्हावे लागते. यामुळे शिक्षणासाठी वेळ आणि ऊर्जा उपलब्ध होण्यावर मर्यादा येऊ शकतात. अशाप्रकारे गरीबी ही केवळ आर्थिक उत्पन्नाची कमतरता नसून शिक्षणाच्या संधी, वेळ, संसाधने आणि सामाजिक सहभाग यावर मर्यादा आणणारी परिस्थिती आहे

9. सामाजिक विषमता आणि उच्च शिक्षण :-

गरिबी बरोबरच सामाजिक विषमता हा ग्रामीण महिलांच्या उच्च शिक्षणातील महत्त्वाचा घटक आहे. जात,लिंग,वर्ग,ग्रामीण- शहरी भेद कुटुंबाचे आर्थिक स्थिती आणि पालकांचे शैक्षणिक स्तर यांचा मुलींच्या शिक्षणांवर परिणाम होऊ शकतो. समाजशास्त्र दृष्टिकोनातून पाहता, शिक्षणाची संधी केव्हा व्यक्तीच्या क्षमतेवर अवलंबून नसते. व्यक्ती कोणत्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीत जन्माला आली आहे, याचाही तिच्या शैक्षणिक संधींवर परिणाम होतो. ग्रामीण भागातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांना अनेकदा एकापेक्षा अधिक प्रकारच्या विषमतेचा सामना करावा लागू शकतो.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

उदाहरणार्थ, आर्थिकदृष्ट्या सक्षम कुटुंबातील मुलीला खाजगी महाविद्यालय, डिजिटल साधने,स्वतंत्र अभ्यासाची जागा,प्रवासाची सुविधा आणि अतिरिक्त मार्गदर्शन मिळू शकते. याउलट गरीब ग्रामीण कुटुंबातील मुलीला महाविद्यालयात जाण्यासाठी लांबचा प्रवास करावा लागू शकतो. आणि मोबाईल इंटरनेट आणि अभ्यासासाठी आवश्यक साधने उपलब्ध नसू शकतात. त्यामुळे समान संधी आणि समान परिणाम यामध्ये फरक आहे. सर्वांना महाविद्यालयात प्रवेशाचे संधी देणे पुरेसे नाही;शिक्षण पूर्ण करण्यासाठी आवश्यक सामाजिक आणि आर्थिक आधार देणे ही आवश्यक आहे. याला समाज शास्त्रीय भाषेत परस्परधेदी विषमता (Intersectionality) असे म्हणतात. म्हणजेच व्यक्तीच्या सामाजिक ओळखी आणि परिस्थिती एकत्र येऊन तिच्या संधीवर परिणाम करतात. त्यामुळे सर्व ग्रामीण महिलांचा अनुभव एकसारखा नसतो. ग्रामीण उच्चवर्गीय महिला, गरीब शेतमजूर कुटुंबातील महिला आणि आदिवासी भागातील महिला यांच्या शैक्षणिक अडचणी वेगवेगळ्या स्वरूपाच्या असू शकतात.

10. कुटुंबीय जबाबदाऱ्या आणि महिलांचे शिक्षण :-

ग्रामीण महिलांच्या उच्च शिक्षणावरील कुटुंबीय जबाबदाऱ्यांचाही परिणाम होतो. मुली किंवा महिलांकडून घरातील स्वयंपाक,पाणी भरणे,लहान बाळांची काळजी घेणे, शेतीची कामे करणे आणि घरगुती कामांमध्ये सहभागांची अपेक्षा केली जाते. विवाह नंतर महिलांवर घरगुती जबाबदाऱ्या वाढू शकतात. विवाह नंतर दोन्ही घरांचा संभाळ तिला करावा लागतो. दोन्हीकडच्या जबाबदाऱ्या सांभाळून शिक्षण सुरू ठेवणे ही तारेवरची कसरत आहे. परिणामी उच्च शिक्षण सुरू ठेवणे किंवा पदव्युत्तर शिक्षण घेणे कठीण होऊ शकते. ही परिस्थिती लैंगिक भूमिकांच्या सामाजिक रचनेशी संबंधित आहे. समाजात महिलांची प्राथमिक भूमिका घराशी आणि पुरुषांची भूमिका उत्पन्नाशी जोडली गेल्यास मुलींच्या उच्च शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन त्याच पद्धतीने तयार होतो.

11. उच्च शिक्षणातील आर्थिक व डिजिटल विषमता :-

आजच्या काळात उच्चशिक्षणांमध्ये डिजिटल साधनांचे महत्त्व वाढले आहे. ऑनलाइन व्याख्याने, ई-पुस्तके, डिजिटल लायब्ररी,ऑनलाईन अर्ज,परीक्षा आणि शैक्षणिक माहिती यासाठी इंटरनेटवर डिजिटल उपकरणांची आवश्यकता असते. गरीब ग्रामीण कुटुंबातील विद्यार्थिनींकडे स्वतंत्र स्मार्टफोन,संगणक किंवा स्थिर इंटरनेट सुविधा नसल्यास त्या डिजिटल शिक्षणाच्या संधी पासून वंचित राहू शकतात. त्यामुळे डिजिटल विषमता ही आधुनिक शैक्षणिक विषमतेचा एक महत्त्वाचा भाग बनली आहे. डिजिटल साक्षरतेचा अभाव, इंग्रजी भाषेतील अडचणी आणि तांत्रिक मार्गदर्शनाची कमतरता यांचाही परिणाम होऊ शकतो. म्हणून ग्रामीण भागातील महिलांसाठी डिजिटल शिक्षण केंद्र, मोफत इंटरनेट सुविधा, संगणक प्रशिक्षण आणि स्थानिक भाषेतील शैक्षणिक सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे.

12. सर्वसमावेशक विकास आणि महिलांचे उच्च शिक्षण :-

सर्वसमावेशक विकास म्हणजे समाजातील सर्व घटकांना विकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेणे. विकासाचा लाभ केवळ आर्थिकदृष्ट्या सक्षम किंवा शहरी लोकसंख्येला न मिळता गरीब,ग्रामीण, महिला, आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांपर्यंत पोहोचविणे आवश्यक आहे.

महिलांचे उच्च शिक्षण हे समावेशक विकासाचे महत्त्वाचे साधन आहे. शिक्षणामुळे महिलांना रोजगारांच्या संधी उपलब्ध होऊ शकतात आर्थिक स्वावलंबन वाढू शकतात,आणि कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत त्यांचा सहभाग वाढू शकतो. भारतातील संविधानातील कलम 39 मध्ये पुरुष आणि महिलांना उपजीविकेच्या पर्याप्त साधनांचा समान अधिकार तसेच समान कामासाठी समान वेतन यासारख्या तत्त्वांचा उल्लेख आहे. National education policy 2020 मध्ये मुली आणि महिलांसाठी समान व गुणवत्तापूर्वक शिक्षणाच्या संधी वाढविण्यासाठी **Gender inclusion fund** सारख्या उपयोजनांचा

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

उल्लेख करण्यात आला आहे. ग्रामीण महिलांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्यास त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक सहभाग वाढण्यास मदत होते. महिलांचे शिक्षण सामाजिक विकासावर परिणाम करू शकते. शिक्षित महिला स्वतःच्या मुलांच्या शिक्षणाबाबत जागरूकता निर्माण करू शकते. आरोग्यविषयक निर्णय घेऊ शकते आणि स्थानिक सामाजिक उपक्रमांमध्ये सहभागी होऊ शकतो. उदा. जसे की बंजारा समाजातील महिला सामाजिक कार्यक्रमांमध्ये उपक्रमांमध्ये सहभागी होऊ शकते जसे तीज उत्सव, गणगौर उत्सव, या उत्सवामध्ये वेगवेगळे उपक्रम साजरे केले जातात आणि त्यामध्ये महिला सहभागी होतात आणि आपला उत्कृष्ट सहभाग दाखवितात आपल्या मधील कलागुणांना जागृत करतात आणि त्या इतरांसमोर मांडतात. महिलांच्या उच्च शिक्षणाकडे केवळ वैयक्तिक प्रगतीचे साधन म्हणून न पाहता समाजाच्या एकूण विकासासाठी आवश्यक असलेली सामाजिक गुंतवणूक म्हणून पाहणे आवश्यक आहे.

13. महिलांचे उच्च शिक्षण आणि सक्षमीकरण :-

उच्च शिक्षणामुळे महिलांच्या सक्षमीकरणाच्या अनेक समस्या निर्माण होतात.

सामाजिक सक्षमीकरण :- महिलांचा सामाजिक सहभाग,आत्मविश्वासाने निर्णयक्षमता वाढविण्यास मदत होते.

आर्थिक सक्षमीकरण :- उच्च शिक्षणामुळे कौशल्यधारीत आणि औपचारिक रोजगाराच्या संधी वाढू शकतात. आपले कौशल्य सादर करण्याचे संधी उपलब्ध करून देणे.

राजकीय सक्षमीकरण :- शिक्षित महिलांमध्ये संविधानिक अधिकार, मतदान,स्थानीय स्वराज्य संस्था आणि सामाजिक प्रश्नाविषयी जागरूकता वाढू शकते. वेगवेगळ्या संस्थांमध्ये आपल्या अधिकारानुसार पदभूषणे. उदा. तालुक्याच्या ठिकाणी नगराध्यक्षाचे पद बसविणे आणि ग्रामीण भागांमध्ये सरपंच उपसरपंचाचे पद ही महिला भूषवत आहे.

कौटुंबिक सक्षमीकरण :- शिक्षित महिला मुलांच्या शिक्षणाबाबत आरोग्याबाबत आणि आर्थिक नियोजनाबाबत अधिक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊ शकते.

अशाप्रकारे एका महिलेच्या शिक्षणाचा परिणाम केव्हा तिच्यापुरता मर्यादित राहत नाही; तो पुढील पिढीपर्यंत पोहोचू शकतो. पिढ्यानपिढ्या शिक्षणाचा वारसा चालत राहिला पाहिजे हे सक्षमीकरणाचे ध्येय आहे. महिला जर शिक्षित झाल्या तरच हे शक्य आहे.

14. पितृसत्ताक व्यवस्था व शैक्षणिक संधी :-

पितृसत्ताक व्यवस्था ही भारतीय समाजातील लिंगाधारीत विषमतेचा महत्त्वाचा घटक आहे. व्यवस्थेमध्ये पुरुषांना कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत अधिक महत्त्व दिले जाण्याची शक्यता असते, तर महिलांकडून घरगुती जबाबदाऱ्या पार पाडण्याची अपेक्षा केली जाते. काही ग्रामीण कुटुंबांमध्ये मुलींच्या उच्च शिक्षणापेक्षा विवाहाला अधिक प्राधान्य दिले जाते. मुलीने उच्च शिक्षणासाठी दुसऱ्या गावात किंवा शहरात जाणे सुरक्षित आहे का या प्रश्नावरून कुटुंबीयांचा विरोध निर्माण होऊ शकतो. मुलींच्या शिक्षणाला आर्थिक गुंतवणूक म्हणून न पाहता विवाहपूर्व आवश्यक टप्पा म्हणून पाहण्याची मानसिकता त्यांच्या उच्च शिक्षणाच्या संधी मर्यादित करू शकतात. या सामाजिक परिस्थितीमध्ये महिलांना शिक्षण रोजगार आणि कुटुंबीयांच्या जबाबदाऱ्या यांचा समतोल राखावा लागतो. कुटुंबीयांमध्ये आपली भूमिका काय आहे हे समजले पाहिजे नुसता चूल आणि मूल ही आपली भूमिका नाही आहे असे महिलांना समजले पाहिजे. आणि ते समजण्यासाठी महिलांना शिक्षण घेणे ही गरजेचे आहे. आणि यामुळे पितृ सत्ता कुटुंबामध्ये परिवर्तन घडायला पाहिजे त्यांच्या विचारांमध्ये परिवर्तन घडायला पाहिजे. त्यामुळे पितृ सत्ता सामाजिक रचनेमध्ये परिवर्तन घडविणे आवश्यक आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

15. ग्रामीण महिलांच्या उच्च शिक्षणातील भौगोलिक आणि पायाभूत अडचणी :-

ग्रामीण भागातील शैक्षणिक सुविधा या अपुऱ्या असतात आणि शैक्षणिक सुविधांचे वितरण सर्वत्र समान नसते. काही गावांमध्ये महाविद्यालय उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थिनींना तालुका किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी जावे लागते. शिक्षणासाठी सार्वजनिक वाहतूक अपुरी असणे, महाविद्यालयीन वेळापत्रक आणि बसच्या वेळांमध्ये विसंगती, सुरक्षित वस्तीगृहांचा अभाव आणि ग्रामीण भागातील मर्यादित शैक्षणिक सुविधा या समस्यांमुळे मुलींचे शिक्षण प्रभावित होऊ शकते. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींसाठी सुरक्षित आणि परवडणारे वाहतूक उपलब्ध करून देणे हे उच्च शिक्षणातील सहभाग वाढविण्या साठी महत्त्वाचे आहे. याशिवाय ग्रामीण महाविद्यालय मध्ये ग्रंथालय, प्रयोगशाळा, संगणक,इंटरनेट,आणि गुणवत्ता पूर्ण अध्यापन सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे.

16. सरकारी धोरणे आणि महिला उच्च शिक्षण :-

भारतीय शासनाने महिला शिक्षण आणि सामाजिक समावेशनासाठी विविध धोरणात्मक तरतुदी केल्या आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये समान आणि सर्वसमावेशक शिक्षणाला महत्त्व देण्यात आले आहे. सामाजिक-आर्थिकदृष्ट्या वंचित गटांतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहभागांतील अंतर कमी करण्यावर या धोरणात भर देण्यात आलेला आहे. या धोरणात मुली आणि ट्रान्सजेंडर विद्यार्थ्यांना समान शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी Gender Inclusion Fund ची तरतूद प्रस्तावित करण्यात आले आहे. (Ministry of Education Government of India NEP 2020) शिष्यवृत्ती, शुल्क सवलत, वसतिगृह सुविधा, उच्च शिक्षणातील आरक्षण, डिजिटल शिक्षण आणि कौशल्य विकासाच्या विविध योजना महिलांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरू शकतात. शासकीय योजनांचा लाभ पात्र विद्यार्थीनी पर्यंत पोहोचविण्यासाठी माहिती, मार्गदर्शन आणि योजना कोणत्या आहे आणि मोफत योजनांचा लाभ घेण्यासाठी आपण कुठे अर्ज करायला पाहिजे अर्जामध्ये काय काय पॉईंट लिहायला पाहिजे अर्जाचा नमुना कसा आहे ते कसा भरायचा याप्रकारे अर्ज प्रक्रियेतील सुलभता आवश्यक आहे.

17. निष्कर्ष (Conclusion) :-

अभ्यासाच्या आधारे पुढील निष्कर्ष मांडता येते

1. ग्रामीण महिलांच्या उच्च शिक्षणामध्ये आर्थिक परिस्थिती महत्त्वाची भूमिका बजावते.
2. गरिबीमुळे शिक्षणाशी संबंधित प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष खर्च पेलणे कठीण होते.
3. सामाजिक व लैंगिक विषमता उच्च शिक्षणाच्या संधीवर परिणाम करू शकते.
4. कुटुंबीय जबाबदाऱ्या आणि विवाहाशी संबंधित सामाजिक अपेक्षा काही महिलांच्या उच्च शिक्षणात अडथळा निर्माण करू शकतात.
5. डिजिटल साधनांची असमान उपलब्धता ही नवीन प्रकारची शैक्षणिक विषमता निर्माण करू शकते.
6. उच्च शिक्षण महिलांच्या सामाजिक,आर्थिक आणि निर्णय क्षमतेच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे.
7. महिलांच्या उच्च शिक्षणातील सहभाग वाढविण्यासाठी केवळ प्रवेश वाढविणे पुरेसे नसून शिक्षण पूर्ण करण्यासाठी आवश्यक आधार व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

8. ग्रामीण महिलांना उच्च शिक्षणाच्या समान संधी मिळाल्यास समावेशक विकासाला चालना मिळू शकते. सर्वसमावेशक विकास साध्य करण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाला समान संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे उपलब्ध संधी ला प्राधान्य देणे व आर्थिक अडचणी कमी करणे, सामाजिक मानसिकतेमध्ये परिवर्तन घडवून आणणे आणि शैक्षणिक सुविधांची न्याय वितरण करणे गरजेचे आहे. ग्रामीण महिलांचे उच्च शिक्षण हा केवळ महिलांच्या विकासाचा विषय नसून सामाजिक न्याय समानता आणि समावेशक राष्ट्र निर्मितीचा महत्त्वपूर्ण आधार आहे. असे आपण म्हणू शकतो.

14. उपाययोजना (Suggestions) :-

ग्रामीण महिलांच्या उच्च शिक्षणातील गरिबी व विषमता कमी करण्यासाठी पुढील उपाय करता येतील :

- **आर्थिक सहाय्य :-** गरीब विद्यार्थिनींसाठी शिष्यवृत्ती आणि आर्थिक सहाय्य वाढविणे.
- **सुरक्षित वाहतूक :-** ग्रामीण भागात मुलींसाठी सुरक्षित व परवडणारी वाहतूक उपलब्ध करणे.
- **वसतिगृह सुविधा :-** मुलींसाठी वस्तीगृहांची संख्या वाढविणे.
- **डिजिटल साक्षरता :-** ग्रामीण महाविद्यालयांमध्ये डिजिटल शिक्षणाच्या सुविधा वाढविणे. गरजू विद्यार्थिनींना डिजिटल उपकरणे व इंटरनेट सुविधा उपलब्ध करून देणे.
- **पालक जागृती :-** पालकांमध्ये मुलींच्या उच्च शिक्षणाविषयी जागृती निर्माण करणे
- **कौशल्य विकास :-** उच्च शिक्षणाबरोबर रोजगाराभिमुख कौशल्यविकासाच्या संधी उपलब्ध करणे.
- **करिअर मार्गदर्शन :-** विवाह मुळे शिक्षण खंडित होऊ नये यासाठी लवचिक शिक्षणाच्या संधी उपलब्ध करणे. ग्रामीण महाविद्यालयांमध्ये समुपदेशन व करिअर मार्गदर्शन केंद्र विकसित करणे.
- **धोरणाची अंमलबजावणी : -** शासकीय योजनांचा लाभ पात्र विद्यार्थिनी पर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे.
- **स्थानिक संस्थांचा सहभाग :-** ग्रामपंचायत,महाविद्यालय, स्वयंसेवी संस्था,आणि महिला बचत गट यांच्या समन्वयातून शैक्षणिक जागृती निर्माण करावी
- **शिक्षणातील सातत्य :-** विवाह आर्थिक अडचणी किंवा कौटुंबिक जबाबदारांमुळे शिक्षण खंडित झालेल्या महिलांसाठी मुक्त व दुरस्त शिक्षणाच्या संधी वाढण्यासाठी प्रयत्न करणे.
- **सामाजिक भेदभाव कमी करणे :-** जात, वर्ग,आणि लिंगाधारित भेदभाव कमी करण्यासाठी महाविद्यालयांमध्ये समानता आणि सामाजिक न्याय विषयक उपक्रम राबवावेत

Ministry of education च्या **Unnat Bharat Abhiyan** मध्ये उच्च शिक्षण संस्थांनी ग्रामीण समाजातील विकासाच्या समस्यांशी जोडले जाऊन स्थानिक गरजांवर आधारित उपाय विकसित करण्यावर भर दिला आहे.

15. निष्कर्ष :-

ग्रामीण महिलांच्या उच्च शिक्षणातील गरिबी आणि सामाजिक विषमता ही केवळ शैक्षणिक समस्या नसून ते व्यापक सामाजिक,आर्थिक आणि सांस्कृतिक समस्या आहे. महिलांना उच्च शिक्षणाच्या संधी मिळाल्याशिवाय समाजातील

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

विकासाची प्रक्रिया पूर्णपणे समावेश होऊ शकत नाही. आज महिलांचा उच्च शिक्षणातील सहभाग वाढत असला तरी ग्रामीण,गरीब आणि सामाजिकदृष्ट्या वंचित महिलांसाठी समान संधी सुनिश्चित करणे हे अजूनही महत्त्वाचे आव्हान आहे. म्हणूनच "प्रवेशाची समानता" सोबत "संधींची समानता आणि शिक्षण पूर्ण करण्यासाठी आवश्यक आधार"यावर भर देणे गरजेचे आहे. ग्रामीण महिलांना गुणवत्तापूर्वक उच्च शिक्षण उपलब्ध करून दिल्यास त्यांचे आर्थिक स्वावलंबन,सामाजिक स्थान,निर्णयक्षमताआणि आत्मविश्वास वाढवण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे महिला शिक्षणाला खर्च म्हणून न पाहता समावेशक आणि शाश्वत विकासाची गुंतवणूक म्हणून पाहणे आवश्यक आहे.

संदर्भ सूची (Reference) :-

1. Ministry of Education, Government of India. all India survey on higher education (AISHE) 2020-21
2. Ministry of Education, Government of India. (AISHE) Report 2021-2022.
3. Ministry of Statistics and Programme Implementation, Government of India. Women and Men in India 2025: selected indicator and Data.
4. Ministry of Education government of India. Gender inclusive Holistic Education in NEP
5. Government of India, Ministry of Education. Unnat Bharat Abhiyan.
6. Government of India. constitution of India - Article 39
7. Ambedkar, B. R. (विविध भाषणे आणि विविध लेखन) Babasaheb Ambedkar: writing and speeches. Government of Maharashtra.
8. Bourdieu, P (1986). The forms of capital. In J. G. Richardson (Ed.), handbook of 3D and research for the sociology of education. greenwood Press.
9. Government of India, Ministry of Statistic and Program Implementation. Women and Men in India. New Delhi
10. Sen, A. (1999). Development as freedom. Oxford University press and (1992). Inequality Re-examined Oxford University press.